सूर्यान एनर्जी प्रा. लि.
सोलर बसवा अन् ७८ हजार सबसिडी मिळवा!
लाईट बिल 'झिरो' करा.
आजच शासन योजनेचा लाभ घ्या
पत्ता : राहुरी स्टेशन रोड, १८ एकर समोर, राहुरी.
शाखा : श्रीरामपूर । पुणे । रायगड । कोल्हापूर
संपर्क : ९२०९१७६०३०, ९८९०३०६८९०

दैनिक दिव्य सार्वमंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगलवर पहा
www.sarvmanthan.in

। शर्ट । टि-शर्ट । जीन्स । अरमानी । ट्रॅकपॅन्ट । किड्स वेअर ।
PATIL MENS WEAR
राहुरीत प्रथमच लहान मुलामुलींच्या व मेन्स वेअर यासह सर्व आकर्षक
भरघोस ऑफर
Kids Wear
प्रोप्रा. प्रसादशेठ डहाळे ९०७५४००१११
गाळा नं. २२/२३, भागीरथीबाई शाळेजवळ, एसएस मोबाईल शॉपीसमोर, कॉलेज रोड, राहुरी, जि. अहमदनगर
०३ नोव्हेंबर २६

अहिल्यानगर । महाराष्ट्र । वर्ष १ ले । अंक १७४ वा । शुक्रवार, ०६ नोव्हेंबर २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये
RNI No. MHMAR/26/A3154 । पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028
जळगाव, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक

शरद पवार-प्रफुल्ल पटेल भेटीने महाराष्ट्राच्या

राजकारणात मोठी खळबळ!



दिव्य सार्वमंथन मुंबई । वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात भेट घेतली. या भेटीनंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

। १० नोव्हेंबरनंतर पुन्हा एकत्र बसणार

। राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाच्या चर्चा

शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची विचारपूस करण्यासाठी प्रफुल्ल पटेल रुग्णालयात पोहोचले होते. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे दीड तास चर्चा झाल्याचे वृत्त आहे.

या भेटीतील संभाषणाचा व्हिडिओही समोर आला आहे. त्यामध्ये शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांना, "दिवाळीनंतर म्हणजे १० तारखेनंतर आपण एकत्र बसून चर्चा करू," असे सांगितल्याचे दिसत आहे.

या विधानामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार का? पक्षातील राजकीय मतभेदसंपुष्टातयेणार पान २ वर



राज्य उत्पादन शुल्क पथकाच्या वाहनावर दगडफेक

देवळाली प्रवरा येथील घटना; अवैध दारू विक्रेत्यांची मुजोरी; वाहनाची काच फोडत अधिकारी-कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

दिव्य सार्वमंथन दे. प्रवरा । प्रतिनिधी

अवैध गावठी दारू विक्रीविरोधात कारवाई करण्यासाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकालाच दगडफेकीचा सामना करावा लागल्याची धक्कादायक घटना देवळाली प्रवरा येथील वडारवाडा परिसरात गुरुवारी (दि. ५) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. कारवाई सुरू असतानाच अज्ञात व्यक्तींनी उभी असलेल्या सरकारी वाहनाच्या पुढील काचेवर दगडफेक करून काच फोडली. एवढेच नव्हे तर पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत दहशत निर्माण करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. या प्रकारामुळे अवैध दारू विक्रेत्यांची मुजोरी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाभळेश्वर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक संजय हांडे यांच्यासह पाच ते सहा अधिकारी व कर्मचारी देवळाली प्रवरा येथील वडारवाडा भागात अवैध गावठी दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी





गेले होते. पथकाची कारवाई सुरू असतानाच अचानक काही जणांनी सरकारी वाहनाच्या पुढील काचेवर दगडफेक केली.

त्यानंतर परिसरात जमाव जमा झाला. जमावातील काही जणांनी आरडाओरडा करीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली आणि कारवाईत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, अंधाराचा फायदा घेत दगडफेक करणारे घटनास्थळावरून पसार झाले. सरकारी वाहन रस्त्यावर उभे असताना ही दगडफेक करण्यात आल्याचे समजते. या घटनेप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दगडफेक करणाऱ्यांविरोधात रात्री अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध दारू विक्रीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या शासकीय पथकावरच हल्ला होत असेल, तर अवैध धंदे करणाऱ्यांचे धाडस किती वाढले आहे, असा संतप्त सवाल या घटनेनंतर उपस्थित होत आहे. दगडफेक करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

यासह राहुरी तालुक्यातील ताहाराबाद परिसरातील हॉटेलमध्ये सर्रासपणे बनावट दारू विक्री होत असून या ठिकाणी छापेमारी करावी अशी मागणी ताहाराबाद येथील जागृत ग्रामस्थांमधून होत आहे.

राहुरी तालुक्यात सर्रासपणे अवैध दारू विक्री त्याचप्रमाणे गावठी दारू निर्मितीचे अड्डे असून याकडे पोलिसांसह एक्साईझ विभागाचे कायम दुर्लक्ष असते. संबंधीत विभागाने कारवाई केल्यानंतर ठरावीक काही दिवस व्यवसाय बंद ठेवले जाते, त्यानंतर पहिले पाढे पंचावन्न याप्रमाणे अवैध दारू विक्री जोमाने सुरु होते. याबाबत संबंधीत प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन हे दारू अड्डे कायम स्वरूपी बंद करावे, अशी मागणी नागरीकातून होत आहे.

राहुरी बाजार समिती
कांदा आवक भाव

आवक	२५५३८
नं. १ कांदा	४००० ते ४५००
नं. २ कांदा	३००० ते ४०००
नं. ३ कांदा	५०० ते ३०००
गोल्टी	२००० ते ३८००
एक्स्ट्रा सुपर क्वॉलिटी	४८००

धनत्रयोदशी

त्रयोदश्यांदीपदानात
सूर्य ज प्रयताम् मम
दीपदान करे सकला
विशेषतः पूजावा यम
मृत्यूनांदंडपाशाभ्याम्
स्वस्थायुष्य देही मम्
उजळावे दीपोत्सवाने
करा काही पुण्यकरम
धन्वंतरी देवांचा वैद्य
या शुभदिनी घे जनम्
ऋण कृतज्ञता करता
रे आनंद लाभेल परम
लक्ष्मी देवता प्रकटली
समुद्र मंथनातून चरम
धर्मा मागे शास्त्र कळे
मिटेल तेंव्हा ते संभ्रम
सढळ हस्ते दान करी
पाळा मानवता धरम
आळसात नको जीणे
सार्थ जीवना परिश्रम
आयु अल्प सांगी यम
आखा नीट कार्यक्रम
पाप टाळ पुण्य संचय
सुनियोजित दिन क्रम
श्रेष्ठतम जीवनसुसंधी
जनम् ना माणसासम
आयुष्य करावे सुगंधी
गुणवर्धन रे ईश्वरासम
- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

ताहाराबाद-म्हैसगाव रोडवर

देशी, विदेशी दारूचे धाबे सुसाट?

- तीन चार हॉटेल-धाब्यांवर अवैध बनावट देशी-विदेशी दारूची सर्रास विक्रीची चर्चा
- पोलिसांसह एक्साईझचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

दिव्य सार्वमंथन ताहाराबाद । प्रतिनिधी

पश्चिम भाग म्हणून ओळख असलेल्या राहुरी-ताहाराबाद-म्हैसगाव रस्त्यालगत तसेच ताहाराबाद गावापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या तीन चार हॉटेल-धाब्यांवर सर्रासपणे बनावट अवैध देशी-विदेशी दारूची विक्री होत असल्याची नागरिकांमधुन चर्चा होत आहे.

या भागातील काही हॉटेल धाब्या वाल्यांची प्रशासनाबरोबर उठबस असल्याकारणाने त्या ठिकाणी कारवाई होत नसल्याची ही दबक्या आवाजात चर्चा होत आहे. यामुळे या भागातील अवैध दारूविक्रीला नेमका कुणाचा 'आशीर्वाद' आहे, असा सवालही नागरिकांमधून उपस्थित करण्यात आला आहे.

या रस्त्यावरील असणार्या हॉटेल-धाब्यांवर विंना परवानगी दारूची विक्री होत होत असुन. विशेष म्हणजे, या प्रकाराकडे संबंधित राज्य उत्पादन शुल्क व पोलीस प्रशासन का दुर्लक्ष करतात असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या भागातील काही हॉटेल धाबे वाले आपण पोलिसांच्या जवळचे या आविर्भावात वागत असुन त्यामुळे आम्ही सर्रासपणे बनावट दारू विकू शकतो त्याच्यामुळे आमचा कोणी काही करू शकत नाही तसेच आम्ही आमच्याशी पंगा घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाच लुचपतच्या जाळ्यात अडकवले असल्याचेही संबंधित हॉटेल धाबे वाले फुशारकिने चर्चा करत आहे.

या दारू विक्रीत्यांना मोठ्या प्रमाणात पान २ वर

शिक्षकांची पदे वाचवण्यासाठी

बोगस पटसंख्येचा खेळ!

राहुरीतील शाळांमधील प्रकार; मुख्याध्यापकांसह शिक्षक रडारवर

दिव्य सार्वमंथन राहुरी । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अतिरिक्त पदे वाचवण्यासाठी बोगस विद्यार्थ्यांची पटसंख्या दाखविल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनंतर या कथित गैरप्रकाराचा पर्दाफाश झाला असून, शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाल्यास शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरून बदलीची वेळ येऊ शकते. ही शक्यता टाळण्यासाठी काही शाळांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी संगनमताने अस्तित्वात नसलेल्या विद्यार्थ्यांची नावे पटावर दाखविल्याचा आरोप आहे.

> राहुरी तालुक्यात काही ठिकाणी अनाधिकृत खाजगी शाळा असल्याची चर्चा होत असून याकडे शिक्षण विभागाने लक्ष घालून कारवाई करण्याची ही मागणी करण्यात येत आहे. राहुरी तालुक्यात असलेल्या अनधिकृत काही शाळांबाबत शिक्षण विभागाकडे तक्रार करण्यात आले असतानाही यावर कारवाई होत नसल्याची ही खंत काही नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणात आणखी धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित शाळांमधील काही शिक्षकांच्या पत्नी आणि नातेवाईकही कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. बोगस विद्यार्थ्यांचे दाखले गोळा करण्यामध्ये शिक्षकांच्या नातेवाईकांचा सहभाग असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे.

तपासणीदरम्यान एका विद्यार्थ्याचे नाव हजेरी पुस्तकात नोंदलेले असतानाही त्याने संबंधित शाळेत प्रत्यक्ष हजेरी लावली नसल्याचे, तसेच तो अन्य शाळेत शिक्षण घेत असल्याचे उघड झाल्याचे सांगण्यात येत आहे. गैरप्रकार लपविण्यासाठी हजेरी पुस्तकात खाडाखोड करणे, पाने चिकटविणे असे प्रकारही दप्तर तपासणीत आढळल्याची माहिती आहे. पान २ वर

१८ संचालकांचे पाठबळ; तरीही अध्यक्षपदाचा सस्पेन्स कायम

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी १२ नोव्हेंबरला

सत्तासंघर्षाचा फैसला!

डॉ. विखेंच्या नावाची चर्चा; फडणवीसांच्या निर्णयाकडे लक्ष

दिव्य सार्वमंथन अ.नगर । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाचा फैसला आता १२ नोव्हेंबरला होणार आहे. २१ संचालकांच्या निवडीनंतर बँकेच्या सत्तेची सूत्रे कोणाच्या हाती जाणार, याची राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. निवडणुकीत १८ जागांवर विजय मिळवून सहकार विकास आघाडीने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असले, तरी अध्यक्षपदाच्या खुर्चीवर नेमका कोण विराजमान होणार, याबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे. विशेष म्हणजे, या निवडीत भाजपाची भूमिका आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अंतिम निर्णय निर्णायक ठरण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखालील सहकार विकास आघाडीने तब्बल १८ जागा जिंकत आपली ताकद दाखवून दिली. या विजयामागे डॉ. सुजय विखे पाटील यांनी बजावलेली भूमिका विशेष चर्चेत राहिली. दुसरीकडे खासदार नीलेश लंके यांच्या परिवर्तन मंडळाला एक, तर विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटाला दोन जागा मिळाल्या. त्यामुळे संचालक मंडळात सहकार विकास आघाडीचे पारडे जड असले, तरी अध्यक्षपदाच्या निवडीच्या निमित्ताने राजकीय समीकरणांची नव्याने जुळवाजुळव सुरू झाली आहे.

अध्यक्षपदासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नावाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. निवडणुकीत त्यांनी केलेले संघटन, पक्षासाठी दिलेले योगदान आणि जिल्हा बँकेच्या सत्ताकारणात बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका यामुळे त्यांच्या नावाला वरिष्ठ स्तरावरून अनुकूलता असल्याचे बोलले जात आहे. मात्र, अंतिम निर्णय भाजपाचे वरिष्ठ नेतृत्व आणि पान २ वर

धामोरी फाट्यावर रक्तरंजित थरार!

तरुणावर कोयत्यानी सपासप वार करून बेदम मारहाण

दै. सार्वमंथनने या वादाला फोडली होती वाचा

दिव्य सार्वमंथन राहुरी । प्रतिनिधी

किरकोळ वादाचा राग मनात धरून सहा जणांनी एका ३७ वर्षीय तरुणावर कोयते, लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना राहुरी तालुक्यातील धामोरी फाटा येथे घडली. या हल्ल्यात लक्ष्मीकांत शिवाजी उगले (वय ३७, रा. धामोरी बुद्रुक) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे धामोरी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत जखमी लक्ष्मीकांत उगले याने पोलिसात दिलेल्या जबाबानुसार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास नगर-राहुरी महामार्गावरील वांबोरी फाटा येथे त्याचा नितीन शाम जंगम याच्याशी किरकोळ वाद झाला होता. यावेळी नितीन याने शिवीगाळ करत 'तुला आज जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

त्यानंतर रात्री आठ वाजण्याच्या सुमारास लक्ष्मीकांत उगले हा धामोरी फाटा येथील दीपक गव्हाणे यांच्या घरासमोरून पायी आपल्या घरी जात असताना नितीन जंगम, निखिल जंगम, शाम शंकर जंगम, कृष्णा (पूर्ण नाव माहीत नाही) आणि अन्य दोन अनोळखी इसम अशा सहा जणांनी त्याला अचानक गाठले. त्यांच्या हातात कोयते, लोखंडी रॉड आणि लाकडी दांडे होते.

'हा लक्ष्मीकांत जास्त माजला आहे, याचा माज आज जिरवू,' असे म्हणत हल्लेखोरांनी त्याला शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर नितीन जंगम याने जिवे मारण्याच्या उद्देशाने हातातील कोयत्याने लक्ष्मीकांतच्या डोक्यावर वार केला. निखिल जंगम यानेही कोयत्याने हल्ला केला. हा वार उजव्या कानाच्या मागे लागला. कृष्णा याने केलेला कोयत्याचा वार उजव्या हाताच्या पान २ वर



संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

'गोकुळ'चा सत्तासंघर्ष!

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकार क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सहकारी साखर कारखाने, दूध संघ, बँका आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राजकारणाची समीकरणे ठरत असतात. त्यामुळेच या संस्थांवरील वर्चस्व म्हणजे केवळ आर्थिक सत्तेची प्राप्ती नसून राजकीय ताकद वाढविण्याचे प्रभावी साधन मानले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण तर सहकाराच्या भोवतीच मोठ्या प्रमाणावर फिरताना दिसते. कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातील सत्तासंघर्षाने पुन्हा एकदा याच राजकीय वास्तवाचे दर्शन घडविले आहे. एका दूध संघाच्या निवडणुकीने राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांना आमनेसामने आणले, हे या संघर्षाचे राजकीय महत्त्व अधोरेखित करणारे आहे.गोकुळ दूध संघ हा केवळ दूध संकलन आणि विक्री करणारा सहकारी व्यवसाय नाही. हजारो दूध उत्पादक शेतकरी, त्यांच्यावर अवलंबून असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकाराच्या माध्यमातून उभे राहिलेले आर्थिक जाळे यांचा तो महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे या संस्थेवरील नियंत्रण मिळविण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रतिष्ठा पणाला लावणे अनपेक्षित नाही. मात्र, सहकारी संस्थेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांची प्रतिष्ठा इतकी मोठी ठरू लागली की, मूळ उद्देशच मागे पडतो की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. गोकुळच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकत महायुतीच्या समर्थकांना १२ जागांवर रोखले. संख्येने हा विजय अत्यंत निसटता असला, तरी राजकीयदृष्ट्या त्याचे महत्त्व मोठे होते. राज्यातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री आणि दिग्गज नेते कोल्हापुरात ठाण मांडून असतानाही सतेज पाटील यांनी मिळविलेला हा विजय त्यांच्या राजकीय ताकदीची साक्ष देणारा ठरला. मात्र, लोकशाही प्रक्रियेत निवडणूक जिंकणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्या विजयाचा सन्मान राखणेही आवश्यक असते. निवडणुकीनंतर अध्यक्षपदाच्या निवडीवरून निर्माण झालेला पेच आणि त्यानंतर सुरू झालेली न्यायालयीन लढाई या सत्तासंघर्षाला वेगळ्याच वळणावर घेऊन गेली. २९ ऑक्टोबरच्या बैठकीत महायुतीचे संचालक अनुपस्थित राहिल्याने गणपूर्तीचा प्रश्न निर्माण झाला. त्यानंतर अध्यक्षपदाच्या निवडीबाबत वाद निर्माण झाला आणि प्रकरण न्यायालयात पोहोचले. उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने १० नोव्हेंबर रोजी पुन्हा सभा घेण्याचे निर्देश दिल्याने कायदेशीर प्रक्रियेला नवे वळण मिळाले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गोकुळवर चार मतदानाधिकार असलेले तज्ज्ञ संचालक नियुक्त करण्याचा निर्णय घेतल्याने सत्तासंघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. सरकारला सहकार क्षेत्रातील संस्थांचे कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी कायदेशीर तरतुदी करण्याचा अधिकार निश्चितच आहे. तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्तीमागे संस्थेचे व्यवस्थापन सुधारणे, व्यावसायिक कौशल्य आणणे आणि निर्णयप्रक्रिया अधिक प्रभावी करणे, असा उद्देश असेल तर त्याचे स्वागतच व्हायला हवे. मात्र, तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्तीला मतदानाचा अधिकार देऊन निवडणुकीतून निर्माण झालेल्या सत्तासमीकरणात बदल घडविण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याच्या हेतूविषयी प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विशेषतः एखाद्या संस्थेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर अशा स्वरूपाचा निर्णय घेतला जात असेल, तर त्यामागील कायदेशीर आधार आणि त्याची वेळ या दोन्हींची निष्पक्ष तपासणी होणे गरजेचे आहे. लोकशाही ही केवळ निवडणुका घेण्यापुरती मर्यादित नसते. निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल स्वीकारणे आणि त्यानुसार सत्तेची रचना होऊ देणे, हाही लोकशाहीचा मूलभूत भाग आहे. बहुमत अनुकूल असेल तेव्हा लोकशाहीचा गौरव आणि प्रतिकूल असेल तेव्हा प्रशासकीय किंवा कायदेशीर मार्गांचा आधार घेऊन सत्तेची समीकरणे बदलण्याचा प्रयत्न, अशी भूमिका कोणत्याही राजकीय पक्षाला शोभणारी नाही. अर्थात, प्रत्येक निर्णयाची वैधता न्यायालयीन आणि कायदेशीर निकषांवर तपासली गेली पाहिजे. सरकारचा निर्णय चुकीचा आहे, असा निष्कर्ष केवळ विरोधकांच्या आरोपांवरून काढता येणार नाही. परंतु निवडणुकीतील जनमताचा कौल निष्प्रभ होणार नाही, याची दक्षता घेणे सरकारचेही कर्तव्य आहे. गोकुळमधील या संघर्षात सतेज पाटील, हसन मुश्रीफ आणि महायुतीतील अन्य नेत्यांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे. मात्र, या नेत्यांच्या प्रतिष्ठेच्या लढाईत दूध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न दुय्यम ठरता कामा नयेत. दूध उत्पादकांना त्यांच्या दुधाला योग्य दर मिळतो का, संकलन आणि विक्री व्यवस्थेत पारदर्शकता आहे का, पशुखाद्याच्या वाढत्या किमतींचा विचार होतो का, शेतकऱ्यांना पशुवैद्यकीय सुविधा वेळेवर मिळतात का, संघाची आर्थिक स्थिती किती मजबूत आहे, अशा प्रश्नांना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. कारण गोकुळची खरी ताकद कोणत्याही राजकीय नेत्याच्या पाठबळात नसून दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वासात आहे.सहकार चळवळीची स्थापना ही शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि सामूहिक विकासाचा मार्ग खुला करण्यासाठी झाली होती. मात्र, आज अनेक सहकारी संस्था राजकीय वर्चस्वाच्या लढाया आणि सत्तेच्या गणितांमध्ये अडकताना दिसतात. सहकाराचे राजकारण होणे स्वाभाविक असले, तरी राजकारणासाठी सहकाराचा वापर होणे ही चिंतेची बाब आहे. गोकुळच्या सत्तासंघर्षाने याच वास्तवावर बोट ठेवले आहे.अखेर गोकुळवर कोणाची सत्ता येते, यापेक्षा त्या सत्तेचा उपयोग कोणासाठी होतो, हा खरा प्रश्न आहे. निवडणुकीत विजय मिळविणारे असोत किंवा शासनाच्या निर्णयातून सत्तेत सहभागी होणारे असोत, त्यांच्यासमोर दूध उत्पादकांचे हित सर्वोच्च असले पाहिजे. राजकीय डावपेच, न्यायालयीन लढाया आणि सत्तेची गणिते यापलीकडे जाऊन गोकुळच्या विकासाचा अजेंडा ठरविण्याची गरज आहे. अन्यथा, नेत्यांच्या सत्तासंघर्षात सहकाराची मूळ संकल्पनाच हरवून जाईल. गोकुळच्या सत्तेची लढाई राजकीय नेत्यांसाठी प्रतिष्ठेची असेल; पण हजारो दूध उत्पादकांसाठी ती त्यांच्या उद्याच्या आर्थिक सुरक्षिततेची लढाई आहे. त्यामुळे गोकुळमध्ये सत्ता कोणाचीही असो, सहकाराचा आणि दूध उत्पादकांच्या हिताचा बळी जाता कामा नये!

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत

पालकमंत्री राधाकृष्ण विखेंच्या अध्यक्षतेखाली बैठक

आठवड्याच्या आत ऊसदर जाहीर न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

दिव्य सार्वमंथन नेवासा । विशेष प्रतिनिधी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नासंदर्भात आज अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज महत्वापूर्ण बैठक पार पडली. जिल्हाधिकारी पंकज आशिया, साखर सहसंचालक गणेश पुरी यांच्या उपस्थितीमध्ये ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी, ऊस उत्पादक शेतकरी तसेच साखर कारखान्याचे प्रतिनिधीनीनी सहभाग घेतला यावेळी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित अनेक प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

यामध्ये जिल्ह्यातील साखर कारखानदारानी सण २०२६-२७ या गळीत हंगामाचा अधिकृत ऊसदर जाहीर करावा या प्रमुख मागणीसह शेतकऱ्यांचे वेळेत पेमेंट करावे, तसेच कारखान्याच्या वजन काट्यातील पारदर्शकता बाबत तपासणी, ऊस तोडणी व वाहतूकीच्या नावाखाली बिलातून करण्यात येत असलेली कपात, ऊस नोंदणी व तोडणी कार्यक्रमात पारदर्शकता, तसेच जिल्ह्यातील कारखाण्यानी मागील वर्षाची थकीत एफआरपी तातडीने द्यावी, ऊस शेतकरी



तक्रार निवारण केंद्र सुरु करावे व उसाला प्रति टन चार हजार रुपये भाव देण्यात यावा या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांमध्ये काँग्रेसचे संभाजी माळवदे, भारतीय किसान श्रमिक संघटनेचे नरेंद्र काळे, शिवसेनेचे अभिजित पोटे, शेतकरी संघटनेचे रवी मोरे, निलेश शेंडगे, छावा संघटनेचे रावसाहेब काळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मच्छिन्द्र आरले आदिसह जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. यावेळी संभाजी माळवदे व नरेंद्र काळे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हाधिकारी यांना शेतकरी प्रश्नाचे निवेदन देत बैठकीत आक्रमकपणे शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित केले. यावेळी संभाजी माळवदे यांनी साखर कारखाण्यानी तातडीने ऊसदर जाहीर करावा तसेच चौदा दिवसापेक्षा अधिक काळ थकीत रकमेवर पंधरा टक्के व्याजदर देण्याची मागणी केली जिल्हा बँकेत जसे सर्व विरोधक एकत्र येत भूमिका घेतली तशीच भूमिका ऊस दरासाठी घ्यावी असा टोला लागवला. शेतकरी संघटनेचे नरेंद्र काळे यांनी कारखाण्याच्या वजनकाट्या बाबत प्रश्न विचारत वजन काट्याची तपासणी, पडताळणी, वजन काट्यावर डिस्प्ले बसावा, सीसीटीव्ही बसावे या मागणीसह ऊस तोडणी व वाहतूक, मुकादम कमिशन, मजूर खर्च यांची तपासणी तसेच मागील थकीत एफआरपी कारखान्यावर कारवाईची मागणी केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रवी मोरे यांनी

येत्या चार दिवसात उसदराचा निर्णय न झाल्यास जिल्हाभरात मोठे चक्काजाम आंदोलन उभारण्याचा इशारा या दिला. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नऊ तारखेच्या आत ऊसदर जाहीर करण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना बैठकीत दिले. बैठकीत तोडगा न निघाल्याने हॉलमध्ये शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी मोठया प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

पुराव्यांतील त्रुटींमुळे न्यायालयाचा मोठा निर्णय; दोघांची निर्दोष मुक्तता

ॲड. वर्षा पी. गागरेंचा प्रभावी युक्तिवाद; साक्षीदार आणि ठोस पुराव्यांचा अभाव न्यायालयाच्या निदर्शनास

दिव्य सार्वमंथन राहुरी । विशेष प्रतिनिधी

फौजदारी खटल्यात केवळ आरोप करून चालत नाही, तर आरोपींविरुद्धचे गुन्हे ठोस आणि नि:संशय पुराव्यांनी सिद्ध करणे आवश्यक असते. याच न्यायतत्त्वाचा आधार घेत राहुरी येथील न्यायालयाने एका फौजदारी खटल्यात महत्त्वपूर्ण निर्णय देत नंदराज दत्तात्रय पावसे आणि ललिता प्रकाश दुशिंग या दोघांची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने ॲड. वर्षा पी. गागरे (टाकळीमिया) यांनी प्रभावी युक्तिवाद करत तपासातील त्रुटी, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव आणि पंचनाम्याबाबतच्या उणिवा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.



या खटल्यात भांडणाच्या वेळी शेजारील नागरिक घटनास्थळी जमा झाल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, तपासादरम्यान एकाही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली नसल्याचा महत्त्वपूर्ण मुद्दा ॲड. गगरे यांनी उपस्थित केला. तसेच वैद्यकीय अधिकारी तोंडमल यांनी संबंधित जखमा बांगडी अथवा टोकदार वस्तूमुळे होण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यामुळे जखमांच्या स्वरूपावरून आरोपींविरुद्धचा आरोप निर्विवादपणे सिद्ध होत नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

पंच साक्षीदार चंद्रभान आणि बबन यांनी अभियोग पक्षाच्या बाजूने साक्ष दिली नाही. तसेच पंचनामा कायदेशीररीत्या सिद्ध झालेला नसल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. तपासिक अंम लदारासह इतर साक्षीदारांना वारंवार समन्स बजावूनही ते पुराव्यासाठी न्यायालयात हजर झाले नसल्याचा मुद्दाही बचाव पक्षाने मांडला.

अशा प्रकारे अभियोग पक्षाच्या पुराव्यांमधील त्रुटी आणि साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती अधोरेखित करत ॲड. गागरे (टाकळीमिया) यांनी आरोपींची बाजू प्रभावीपणे मांडली. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपींविरुद्धचे आरोप संशयापलीकडे सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

अखेर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दाखल आरोपांच्या प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) नुसार न्यायालयाने नंदराज दत्तात्रय पावसे आणि ललिता प्रकाश दुशिंग यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश दिला. पुराव्यांचे महत्त्व आणि न्यायालयीन प्रक्रियेत बचाव पक्षाच्या प्रभावी युक्तिवादाची भूमिका अधोरेखित करणारा हा निर्णय ठरला.

मालुंजे खुर्द-महालगाव येथे गरजूंना दिवाळी शिध्याचे वाटप

माजी आ. कांबळे यांच्या हस्ते गरजूंना शिधा वितरण

दिव्य सार्वमंथन मालुंजे । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून गोरगरीब, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून राहुरी तालुक्यातील मालुंजे खुर्द-महालगाव येथे दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने आयोजित या उपक्रमांतर्गत श्रीरामपूरचे माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांच्या हस्ते गरजू नागरिकांना दिवाळी शिध्याचे वितरण करण्यात आले.

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.



अशा परिस्थितीत सणासुदीच्या काळात गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. दिवाळीच्या आनंदात समाजातील प्रत्येक घटक सहभागी व्हावा आणि कोणत्याही कुटुंबाची दिवाळी अडचणीमुळे अंधारात राहू नये, हा या उपक्रमामागील सामाजिक हेतू होता.


या वेळी जयवंतराव पवार, नामदेव झारेकर, पत्रकार संजय झारेकर, राहुल गायकवाड, रामकिसन पवार, रंगनाथ गायकवाड, भानुदास पवार, राजेंद्र झारेकर, भागवत सोळुंके, जालिंदर लोखंडे, आप्पासाहेब गायकवाड, सौ. सविता गायकवाड, जयश्री गायकवाड, मंगल झारेकर, ज्योती लोखंडे, सुनीता झारेकर यांच्यासह ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे गरजू कुटुंबांना दिवाळी सणाच्या काळात मोठा दिलासा मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे मालुंजे खुर्द-महालगाव परिसरातील नागरिकांनी स्वागत केले.

डावखरचा प्रदूषण मुक्त दिवाळीचा संकल्प

दिव्य सार्वमंथन श्रीरामपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र सेवा मंडळ संचलित शंकरराव सतोबा डावखर कन्या विद्यालयात प्रदूषण मुक्त दिवाळीच्या संकल्पनेतून दिवाळी सेलिब्रेशन उत्साहात साजरे करण्यात आले. मुख्याध्यापिका सुवर्णमाला बोधक यांच्या कल्पनेतून पणती सजावट व आकाशकंदील निर्मिती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थिनींनी आकर्षक रंगसंगती व कलाकुसरीने पणत्या सजवत मनमोहक आकाशकंदील तयार करून आपल्या सर्जनशीलतेचे दर्शन घडविले. या कार्यक्रमास जिल्हा व सत्र न्यायालयाच्या स्टेनोग्राफर भारती भेसर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे विश्वस्त कांतीशेठ पटेल व शांतीलाल पटेल यांचे चिरंजीव प्रतिश पटेल व निशित पटेल यांची विशेष उपस्थिती होती. विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमामुळे त्यांच्यात आत्मविश्वास व कलात्मक दृष्टिकोन विकसित झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. औटी यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



पान १ वरून

राजकारणात खळबळ!

का? अशा प्रश्नांची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची भेट ही प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी घेतल्याचे सांगितले. राजकीय घडामोडींवरही चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, आगामी बैठकीचा नेमका विषय अद्याप स्पष्ट झालेला नाही. त्यामुळे १० नोव्हेंबरनंतर होणाऱ्या संभाव्य भेटीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादीच्या राजकारणात नव्या समीकरणांची नांदी ठरणार की केवळ सदिच्छा भेटींपुरतीच चर्चा मर्यादित राहणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

देशी, विदेशी दारूचे धाबे सुसाट?

अवैध व्यवसायातून मोठी माया मिळत असल्याकारणाने त्या अवैध बनावट दारूविक्री करणाऱ्यांचे मनोबल वाढत असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. वेळोवेळी मद्यपान करणाऱ्या मद्यपींना या हॉटेल-धाब्यांवर मद्यपान केल्यानंतर काहींना त्रास जावल्याचेही काही लोकांकडून माहिती मिळाली आहे. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ठिकाणी अवैध व बनावट मद्य विक्री करणाऱ्यावर आतापर्यंत कारवाई होत नाही या ठिकाणी पांगरमल सारखी एखादी दुर्घटना झाल्यास संबंधित प्रशासन याला जबाबदार असणार आहे अशी ही नागरिकांमधून बोलले जात आहे. दुर्गम व पश्चिम भाग असलेल्या ताहाराबाद-म्हैसगाव मार्गावरील या संशयित ठिकाणांची पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे छापेमारी करुण कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

बोगस पटसंख्येचा खेळ!

या संपूर्ण प्रकरणात राहुरी तालुक्यातील आठ जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक आणि सहा शिक्षक संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. तत्कालीन गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यकाळात या प्रकरणी ठोस कारवाई झाली नसल्याने तक्रारदारांनी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला होता. दरम्यान, सध्याच्या गटशिक्षणाधिकारी जयश्री कारले यांनी संबंधित सर्व शाळांची तपासणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठविला आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आल्याने आता जिल्हा परिषद प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. बोगस पटसंख्येच्या या प्रकरणात दोषींवर नेमकी कोणती कारवाई होते आणि शिक्षकांची पदे वाचवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांचे काय होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

...सपासप वार करून बेदम मारहाण

मनगटाजवळ बसला. पुन्हा कोयत्याचा वार होत असताना लक्ष्मीकांतने डाव्या हाताने तो अडविण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यातही त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली. एवढ्यावरच न थांबता सर्व हल्लेखोरांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तो जमिनीवर कोसळल्यानंतर लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनीही त्याच्यावर हल्ला चढविला. या अमानुष मारहाणीत लक्ष्मीकांत बेशुद्ध पडला. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच त्याचा भाऊ जगदीश उगले याने घटनास्थळी धाव घेतली. जखमी लक्ष्मीकांतला खासगी वाहनाने अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी नगर येथील रुग्णालयात पाठविले. सध्या त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. किरकोळ वादातून थेट जीवघेणा हल्ला झाल्याने धामोरी परिसरात संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी नितिन शाम जंगम, निखिल शाम जंगम, शाम शंकर जंगम, कृष्णा नामक आणि दोन अनोळखी व्यक्तीं अशा सहा जणां विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जखमीने आपल्या जबाबातून केली आहे. मारहाणीमुळे उजव्या हाताला दुखापत झाल्याने सही करता येत नसल्याचे नमूद करून त्याने पोलिसांना अंगठ्याचा ठसा देत जबाब नोंदविला आहे.

सत्तासंघर्षाचा फैसला!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर अवलंबून राहणार असल्याने इच्छुकांच्या गोटातही कमालीची उत्सुकता आहे. जिल्हा बँकेचे अध्यक्षपद म्हणजे केवळ सहकारी संस्थेचे नेतृत्व नव्हे, तर जिल्ह्याच्या आर्थिक आणि राजकीय सत्ताकारणातील महत्त्वाचे केंद्र मानले जाते. त्यामुळे या पदावर कोणाची वर्णी लागते, यावर आगामी काळातील जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणाची दिशा ठरणार आहे. १८ संचालकांचे भक्कम संख्याबळ असतानाही अध्यक्षपदासाठी कोणाच्या नावावर एकमत होते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी नूतन संचालक मंडळाची बैठक होणार असून, याच बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडणार आहे. सकाळी ११ ते ११.३० या वेळेत उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर दुपारी १२ वाजेपर्यंत अर्जांची छाननी, १२.३० वाजेपर्यंत अर्ज माघारीची मुदत असेल. दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत मतदान, तर १.३० ते २ या वेळेत मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. एकीकडे १८ संचालकांचे संख्याबळ, दुसरीकडे भाजपातील नेतृत्वाचा निर्णय आणि अध्यक्षपदासाठी चर्चेत असलेली नावे, अशा तिहेरी राजकीय घडामोडींमुळे जिल्हा बँकेची निवडणूक आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

कपाशीच्या शेतात फुलवली गांजाची बाग

मिरजगाव पोलिसांचा छापा, ३१ लाखांचा गांजा जप्त

दिव्य सार्वमंथन राहुरी । प्रतिनिधी

गुरवपिंप्रीत पोलिसांची धडक कारवाई; ६३ किलो ६५५ ग्रॅम गांजासह शेतकरी अटकेत, अंमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले

कपाशीच्या पिकाच्या आड गांजाची लागवड करून लाखोंची कमाई करण्याचा डाव मिरजगाव पोलिसांनी उधळून लावला आहे. कर्जत तालुक्यातील गुरवपिंप्री येथे एका व्यक्तीने चक्क स्वत:च्या कपाशीच्या शेतात गांजाची लागवड केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मिरजगाव पोलिसांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकासह संयुक्त छापा टाकत तब्बल ६३ किलो ६५५ ग्रॅम गांजा, ज्याची बाजारातील किंमत ३१ लाख ८२ हजार ७५० रुपये आहे, असा अंमली पदार्थ जप्त केला. या प्रकरणी तात्याराम भिकाजी गावडे (रा. गावडेवाडी, गुरवपिंप्री, ता. कर्जत) याला अटक करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्हा अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना अंमली पदार्थांची लागवड, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली मिरजगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड व पथक बुधवारी (दि. ४ नोव्हेंबर) रात्री गस्त घालत होते.



याचदरम्यान झंजाड यांना गोपनीय बातमीदारामार्फत गुरवपिंप्री येथील एका व्यक्तीने आपल्या कपाशीच्या शेतात गांजाची लागवड केल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी माहितीची पडताळणी करून गावडे याच्या राहत्या घराशेजारील कपाशीच्या शेतात संयुक्त छापा टाकला. यावेळी गांजाची लागवड केल्याचे उघड झाले. पोलिसांनी तब्बल ६३.६५५ किलो वजनाचा आणि ३१,८२,७५० रुपये किमतीचा गांजा जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले.

या प्रकरणी मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९४/२०२६ अन्वये अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (एनडीपीएस) कलम ८ (क), २० (ब) (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण जगदाळे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, पोलीस उपनिरीक्षक किरण जगदाळे, गणेश ठोंबरे, सुनील खैरे, गोकुळ पळसे, अमित बरडे, स्वाती जगधने, चालक राहुल सपट तसेच कर्जत उपविभागीय पोलीस कार्यालयातील मनोज लातुरकर व सागर जंगम यांनी पार पाडली.

गुरवपिंप्रीतील या कारवाईनंतर मिरजगाव पोलिसांनी आपल्या हद्दीतील नागरिकांना अंमली पदार्थांची लागवड, साठवणूक किंवा विक्री करणाऱ्यांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कपाशीच्या शेतात गांजाची लागवड करण्याचा प्रकार उघड झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून, अशा अवैध धंद्यांचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

देवळाली प्रवरा येथे बिबट्याचा मुक्त संचार

मोबाईल कॅमेऱ्यात बिबट्या कैद

दिव्य सार्वमंथन देवळाली प्रवरा । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील कदम वस्ती देवीचा मळा परिसरात बिबट्याचा मुक्त संचार आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रगतशील शेतकरी संजय अशोकराव कदम यांच्या वस्तीवर बिबट्या फिरत असल्याचे मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाले आहे. विशेष म्हणजे, परिसरातील शेतात बिबट्याच्या पिल्लांचे ठसेही आढळून आले आहेत.

याबाबत वन विभागाला माहिती देण्यात आली आहे. मात्र, अद्याप वन विभागाकडून ठोस दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या परिसरात शेतकरी व मजूर शेतीकामासाठी ये-जा करतात. तसेच अनेक शेतकऱ्यांची पाळीव जनावरे वस्तीवर बांधलेली असतात. अशा परिस्थितीत बिबट्याच्या मुक्त संचारामुळे पशुधनासह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पाळीव जनावरांवर किंवा एखाद्या मनुष्यावर हल्ला झाल्यानंतरच वन विभागाला जाग येणार का? असा संतप्त सवाल कदम वस्ती परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.



'धन्वंतरी'च्या सभासदांना ९ टक्के लाभांश वाटप

अरुण तनपुरे यांच्या हस्ते लाभांश वितरण

दिव्य सार्वमंथन राहुरी फॅक्टरी । प्रतिनिधी

श्रीविवेकानंद नर्सिंग होम ट्रस्टच्या धन्वंतरी कामगार व रुग्णालय पतसंस्थेच्या सभासदांना ९ टक्के लाभांशाचे वाटप ट्रस्टचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे चेअरमन गजानन वराळे यांनी पतसंस्थेच्या कामकाजाची माहिती दिली. अरुण तनपुरे म्हणाले की, पतसंस्थेच्या माध्यमातून गरजू सभासदांना वेळेत कर्ज उपलब्ध करून देणे आणि त्याची योग्य पद्धतीने वसुली करणे, तसेच पारदर्शक व नियोजनबद्ध कारभार राखणे यामुळे सभासदांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. याच विश्वासाच्या



बळावर संस्थेला ९ टक्के लाभांश देणे शक्य झाले आहे.

या कार्यक्रमास पतसंस्थेचे चेअरमन गजानन वराळे, व्हाइस चेअरमन विजय डुकरे, ज्येष्ठ संचालक डॉ. चेतना कुलकर्णी, डॉ. अनंतकुमार शेकोकार, संचालक मंडळाचे सदस्य डॉ. निलेश जाधव, भगवानराव म्हसे, दत्तात्रय चव्हाण, दत्तात्रय हिवाळे, ज्ञानेश्वर टिक्कल, सीताराम गाडे, सौ. शोभा ठुबे, विमलताई हुडे, सेक्रेटरी जी. डी. बोर्डे, आबासाहेब वाळुंज यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्हाइस चेअरमन विजय डुकरे यांनी केले, तर ज्येष्ठ सभासद डॉ. कड यांनी आभार मानले.

राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धेत

सोनईच्या सूर्या काकडेला रौप्य पदक

सुजाता इंटरनॅशनल स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा

दिव्य सार्वमंथन सोनई । प्रतिनिधी

सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आणि मॉडर्न कॉलेज ऑफ बीसीए, सोनई येथील इयत्ता बारावीचा विद्यार्थी सूर्या कमलेश काकडे याने राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे.

दिल्ली येथे झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील खेळाडूंशी सामना करत सूर्याने आपल्या खेळातील कौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. त्याच्या या यशामुळे सोनईच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा क्रीडा विभाग, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन बारामती येथील जिल्हा क्रीडा संकुलात करण्यात आले होते.

१९ वर्षांखालील (अंडर-१९) वयोगटात सूर्या काकडे याने आपल्या खेळाची छाप पाडत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. या कामगिरीच्या जोरावर त्याची राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली होती.

दिल्ली येथे दि. १ ते ५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विविध राज्यांतील प्रतिभावान खेळाडू सहभागी झाले होते. सूर्या काकडे याच्या



या उल्लेखनीय यशाबद्दल सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच मॉडर्न कॉलेज ऑफ बीसीए, सोनई यांच्या वतीने त्याचे विशेष अभिनंदन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरणजी सोनवणे, प्राचार्या ज्योती सोनवणे, शिक्षकवृंद, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी त्याच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला.

घरासमोर गाडी लावण्याच्या कारणावरून मारहाण

दिव्य सार्वमंथन अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील माळीवाडा परिसरातील इवळे गल्लीत घरासमोर गाडी लावण्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन जणांनी एकाच्या घरात घुसून लोखंडी दांडयाने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसंत केशव पालवे (वय ७३, रा. इवळे गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार आरोपी पूजा हस्तीमल मुथा व संकेत उर्फ हर्ष हस्तीमल मुथा (दोघे रा. इवळे गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी ही मारहाण केली आहे.

काल रात्री आठ वाजण्याच्या सुमारास इवळे गल्लीतील फिर्यादीच्या घरासमोर गाडी लावण्यावरून वाद झाला होता. वादाच्या कारणातून आरोपींनी संगनमत करून थेट फिर्यादीच्या घरात प्रवेश केला. घरातील व्यक्तीला लाकडी दांडयाने बेदम मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. याशिवाय आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

नरभक्षक बिबट्याची दहशत कायम; गोधेगावात महिलेवर हल्ला

एक बिबट्या जेरबंद करूनही हल्ले सुरूच; शूटअॅट साइटची ग्रामस्थांची मागणी

दिव्य सार्वमंथन नेवासा । प्रतिनिधी

गोधेगाव परिसरात एका बिबट्याला जेरबंद केल्यानंतरही हल्ल्यांचे सत्र थांबलेले नाही. गुरुवारी पहाटे साडेचारच्या सुमारास वीजपुरवठा खंडित असताना कुसुम हिरामण पल्हारे (वय-५०) या महिलेवर बिबट्याने जीवघेणा हल्ला केला. जवळच असलेल्या नातवाने आरडाओरडा केल्याने त्यांचा जीव वाचला. हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून, नेवासा फाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्यांना अहिल्यानगर येथे हलविल्याचे समजते. एका बिबट्याला पकडल्यानंतरही पुन्हा हल्ले होत असल्याने बिबट्याला मानवी रक्ताची चटक लागली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे गंगाथडी परिसरात भीतीचे वातावरण आहे.

गोधेगाव येथे यापूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात सुरेश ऊर्फ भोऱ्याबाबा अहिरे यांचा मृत्यू झाला होता. भालगाव येथे शिवराज शिंदे या बालकावर, तर धामोरी परिसरात बिहारी शेतमजुरावर हल्ला करून त्याचा पाय गंभीर जखमी केला होता. या घटनांनंतर आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या पाठपुराव्याने वनविभागाने शोधमोहीम राबवून एका बिबट्याला जेरबंद केले होते. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र, नव्या हल्ल्याने पुन्हा भीतीचे सावट पसरले आहे. एक बिबट्या पकडून वनविभागाची मोहीम संपली का? मानवी वस्तीत पुन्हा हल्ले होत असतील तर उर्वरित बिबट्यांचा शोध कधी घेणार? असे सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

गुरुवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास बिबट्याने एका कुत्र्याला ठार केले. त्यानंतर पहाटे पल्हारे यांच्यावर झडप घातली. नातवाच्या आरडाओरड्यामुळे आणि बिबट्याच्या जबड्यात त्यांची मान व्यवस्थित न आल्याने त्या बचावल्या. क्षणभराचा विलंब झाला असता तर आणखी एका जीवावर बेतले असते. या घटनेने शेतकरी, महिला आणि शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वनविभागाने अतिरिक्त गस्त पथके तैनात करून पिंजऱ्यांची संख्या वाढवावी आणि बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा.बिबट्याला नरभक्षक घोषित करून ठार मारण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेनुसार शूट अॅट साइटचे आदेश द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. बिबट्याच्या दहशतीने नागरिक घरातही सुरक्षित नसतील, तर त्यांच्या



जीविताची जबाबदारी कोणाची? आणखी किती हल्ल्यांची व जीव जाण्याची वाट पाहणार? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

बालसंगोपन योजना आता ऑनलाईन

हेळसांड थांबून गती येणार; अर्जाची सद्यस्थिती कळणार

२ लाख लेकरांना दिलासा; साऊ एकल महिला समितीच्या पाठपुराव्यास यश

दिव्य सार्वमंथन टाकळीभान । प्रतिनिधी

सुवर्ण महोत्सवी वर्षे साजरे केलेल्या महिला व बालविकास विभागाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे कामकाज आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आले आहे. त्यामुळे पालक व लाभार्थी बालकांची आतापर्यंत होणारी आबाळ, हेळसांड थांबून योजनेच्या प्रक्रियेस गती येणार आहे.

मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य व साऊ एकल महिला समितीचे राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे, समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, समन्वयक अशोक कुटे, प्रकाश इथापे, संगीता मालकर, प्रतिमा कुलकर्णी, बाळासाहेब जपे, कारभारी गरड, प्रथमेश सोनवणे, प्रकाश जोंधळे आदींनी योजना ऑनलाईन होण्यासाठी वेळोवेळी शासन दरबारी पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेच्या तत्कालीन उपसभापती व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांना याबाबत समितीच्या वतीने निवेदन देऊन पाठपुरावा केला जात होता. या मान्यवरांसोबत मंत्रालयात झालेल्या विविध बैठकांमध्ये देखील योजनेचे कामकाज ऑनलाइन करण्याची मागणी साळवे व कुलकर्णी यांनी लावून धरली होती. आता या पाठपुराव्याला यश आले आहे.



योजनेच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे नागरिकांना महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवरून थेट ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करण्यासाठी कागदपत्रांची संख्या कमी होऊन नोंदणीपासून ते अर्जाची सद्यस्थिती तपासण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील सुमारे २ लाख ८ हजार बालकांना योजनेचा वेगाने लाभ मिळून त्यांचे सरकारी कार्यालयातील हेलपाटे थांबणार आहेत. सध्या या लाभार्थ्यांना २२५० रू. तर कोरोना लाभार्थ्यांना दरमहा ४ हजार रू. लाभ मिळतो. दोन वर्षांपासून अनुदान थेट डीबीटी द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याचे मिलिंदकुमार साळवे यांनी सांगितले. महाडीबीटी पोर्टलवर योजनेचा अर्ज ऑनलाईनह भरण्यास सुरूवात झाली आहे. त्यासाठी आवश्यक शासन निर्णय, कागदपत्रे अशी माहिती पोर्टलवर देण्यात आली आहे.

कोण पात्र आहेत?

या योजनेद्वारे पात्र बालकांना दरमहा आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे संगोपन कुटुंबाच्या वातावरणात व्हावे, शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी ही योजना आहे. या योजनेअंतर्गत अनाथ, निराधार, एक पालक असलेली तसेच संरक्षण व संगोपनाची गरज असलेल्या शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील पात्र बालकांना दरमहा आर्थिक सहाय्य दिले जाते. येथे मिळणार लाभ पात्र व गरजू बालकांसाठी mahadbt2.maharashtra.gov.in या पोर्टलवर या ऑनलाईन सुविधेचा लाभ मिळणार आहे.

कानिफनाथ दूध संकलन केंद्राकडून

२५ लाखांचे रिबीट वाटप

दिव्य सार्वमंथन राहुरी फॅक्टरी । प्रतिनिधी

देवळाली प्रवरा परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येत बचत गटाच्या माध्यमातून सुरू केलेल्या कानिफनाथ दूध संकलन केंद्राचा चौथा वर्धापन दिन आणि दिवाळीनिमित्त ठेव व रिबीट वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

राहुरी फॅक्टरी येथील श्रीरामपूर रोडवर कार्यरत असलेल्या या दूध संकलन केंद्राने अवघ्या चार वर्षांत परिसरात दर्जेदार आणि विश्वासार्ह दूध संकलन केंद्र म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या एकजुटीतून उभ्या राहिलेल्या या संस्थेच्या वतीने दिवाळीचे औचित्य साधून दूध उत्पादकांना आर्थिक लाभाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते दूध उत्पादकांना ठेव व रिबीट धनादेशांचे वाटप करण्यात आले. वर्षभरात सर्वाधिक दूध



पुरवठा करणाऱ्या प्रथम पाच दूध उत्पादकांचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये दत्तात्रय गजरे, बाबासाहेब उऱ्हे, कारभारी मुसमाडे, ज्ञानेश्वर वाघ आणि दत्तात्रय शिंदे यांचा भेटवस्तू व ठेव-रिबीट धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या वतीने दूध उत्पादकांना प्रतिव्यक्ती ५० किलो साखरेचे वाटप करण्यात आले. तसेच प्रति लिटर १ रुपये ५० पैसे या दराने जवळपास २५ लाख रुपयांचे रिबीट दूध उत्पादकांना वितरित करण्यात आले. याशिवाय दूध उत्पादकांना मिठाईचे वाटप करण्यात आले, तर बचत गटाच्या सदस्यांना बचतीच्या लाभांशाची रक्कम देण्यात आली.

यावेळी बचत गटाचे अध्यक्ष दत्तात्रय वरखडे, उपाध्यक्ष भाऊसाहेब आरंगळे, देवळाली प्रवरा सोसायटीचे चेअरमन मंजाबापू वरखडे, रामभाऊ वरखडे, भगवान वरखडे, दिलीप वरखडे, बाळासाहेब शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापक जगन्नाथ वरखडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चेअरमन दत्तात्रय वरखडे, व्हा. चेअरमन भाऊसाहेब आरंगळे, मंजाबापू वरखडे, गोरख कदम, वसंत वरखडे, आदिनाथ वाणी, दत्तात्रय देठे, अमोल वरखडे, संभाजी वरघुडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

पाहिजेत

सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात

न्युज रिपोर्टर व कॅमेरामन

जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.

दै. सार्व मंथन कार्यालय,

तनपुरेवाडी रोड, अनमोल गणपती मंदिरासमोर, राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072

दैनिक दिव्य **सार्वमंथन** नवी दिशा, नवी आशा

शुक्रवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२६ पान ०४

दैनिक दिव्य **सार्वमंथन** नवी दिशा, नवी आशा

राज्यात कुठेही मिळवा घरपोच 'दैनंदिन अंक'

राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, उद्योग तसेच विविध क्षेत्रांतील दर्जेदार लेख व बातम्या नियमितपणे वाचण्यासाठी आजच अंक बुक करा

घरपोच अंक मिळवण्यासाठी आजच संपर्क साधा.

दै. सार्व मंथन कार्यालय,

तनपुरेवाडी रोड, अनमोल गणपती मंदिरासमोर, राहुरी, जि. अ.नगर.

मो. 9822544072, 9822649346, 9370948911, 9767271094

मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

आमचे सरकार येउ द्या 'गृहमंत्रीच' होऊन दाखवतो–खासदार

– तुमच्या पक्षाची? पक्षप्रमुखांना विचारा बरे! त्यांचाच एक पाय पक्षात व दुसरा 'भाजपमध्ये' दिसतोय?

मुख्याध्यापक लाच घेताना लाचलूचपतच्या जाळ्यात–वृत्त

– शिक्षिकेचे अभिनंदन! न घाबरता लाचखोराला धडा शिकवला! लाच देणारे अनुकरण करतील?

गोकुळचे दूध महायुतीच्या तोंडात?–वृत्त

– बहुमत जरी मिळाले नाही तरी 'इगो' दुखवला गेला ना? काहीही करू पण गोकुळचे दूध घशात घालूच, हिच वृत्ती?

तृतीय पंथीयांकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंचवीस हजारांची मदत–वृत्त

– अभिनंदन! यातून अनेकांनी (शेतकऱ्यांना पाच हजाराची मदत देणाऱ्या सरकारने सुद्धा) बोध घ्यावा?

लंके खासदार झाल्याने अजूनही 'काहींना' झोप येत नाही–प्रताप ढाकणे

– कशी येणार? आणि आता तर बँकेत सामना होणार? आता तर झोपेचे आणि 'त्यांचे' नातेच संपले? डॉक्टर असल्याने विलाज करतीलच? मेंदूचा नाही ओ.... झोपेचा?

४८८ कामगारांच्या संघर्षाला ऐतिहासिक यश

आता शिर्डीचा नावलौकिक वाढविण्याची जबाबदारी कामगारांवर : ना. विखे

पाठपुराव्याला न्यायालयीन निर्णयाची साथ

दिव्य सार्वमंथन शिर्डी । प्रतिनिधी



श्रद्धा आणि सबुरीच्या मंत्रावर विश्वास ठेवत तब्बल वीस वर्षे न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या शिर्डी संस्थानच्या ४८८ कामगारांच्या लढ्याला अखेर ऐतिहासिक यश मिळाले आहे. कामगारांची एकजूट, संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि मंत्रालय स्तरावर जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांना न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाने यशाची मोहोर उमटवली. या निर्णयामुळे ४८८ कामगारांना सेवेत कायम होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने त्यांच्या जीवनात आनंदाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. मात्र, या यशाबरोबरच जबाबदारीही वाढली असून, शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांचे स्वागत, सुरक्षा आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य द्या, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

शिर्डी संस्थानमधील ४८८ कामगारांना सेवेत कायम करण्यासंदर्भात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिल्यानंतर, मंत्री विखे पाटील यांच्या पाठपुराव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कामगार संघटनेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपनगराध्यक्ष अभय शेळके, कामगार पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठलराव पवार यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, कामगारांनी तब्बल वीस वर्षे सातत्याने संघर्ष केला. या संपूर्ण लढ्यात कामगार एकजुटीने आणि विश्वासाने उभे राहिले, ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नावर सकारात्मक भूमिका घेतल्यामुळेच निर्णयापर्यंत पोहोचणे शक्य झाले. काहींनी या लढ्यात संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले; मात्र कामगारांनी श्रद्धा आणि सबुरीचा मार्ग सोडला नाही. या यशामध्ये अनेकांचे योगदान असून, प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे.

यापूर्वी १ हजार ५२ कामगारांना सेवेत कायम करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात झाला होता. त्यावेळी स्व. जयंतराव ससाणे आणि आपण केलेल्या पाठपुराव्यामुळे पहिला महत्त्वपूर्ण निर्णय होऊ शकला. त्या काळातही अनेकांनी अडथळे निर्माण होण्याची प्रतीक्षा केली; मात्र प्रामाणिक हेतूने काम केले तर साईबाबांचा आशीर्वाद पाठीशी राहतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिर्डीसाठी कोणताही निर्णय घेताना वैयक्तिक स्वार्थाला कधीही महत्त्व दिले नाही. वडीलधाऱ्यांकडून मिळालेल्या सामाजिक बांधिलकीच्या संस्कारातून जनतेची कामे करण्याची भूमिका कायम ठेवली. दिलेले आश्वासन पूर्ण करायचे, मात्र जनतेशी प्रतारणा करायची नाही, हीच भूमिका कामगारांच्या प्रश्नातही जपल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कामगारांपुढे आता भाविकसेवेचे आव्हान!

कामगारांना सेवेत कायम होण्याचे यश मिळाले असले, तरी आता त्यांची जबाबदारी अधिक वाढली आहे. देशातील अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रांचा विकास होत आहे. भाविक आपल्या श्रद्धेनुसार विविध तीर्थक्षेत्रांना भेट देत असतात. त्यामुळे शिर्डीत येणाऱ्या प्रत्येक भाविकाला चांगला अनुभव मिळावा, यासाठी कामगारांनी आदरातिथ्य, सुरक्षितता आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. कामगारांच्या वर्तनातूनच शिर्डीची प्रतिमा आणि नावलौकिक अधिक उंचावणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

बंद घर फोडून ७० हजारांचा मुद्देमाल लांबवला

दिव्य सार्वमंथन सोनई । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव (उकिर वाडी) शिवारात अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा एकूण ७० हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हाळस पिंपळगाव येथील रहिवासी राहुल सुभाष गाडेकर (वय २९, धंदा– खाजगी व्यवसाय) यांचे घर बंद असताना, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२:०० वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बंद दरवाजाचे कुलूप कशाने तरी तोडून घरात बेकायदेशीर प्रवेश केला. चोरट्याने कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली १०,००० रुपयांची रोख रक्कम आणि सुमारे ६०,००० रुपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे जुने वापरते दागिने (ज्यात आई मीनाबाई, पत्नी अमृता, आजी गंगूबाई यांचे दागिने व लहान मुलाच्या कानातील व गळ्यातील 'ओम'चा समावेश आहे) असा एकूण ७०,००० रुपयांचा ऐवज चोरून नेला. गाडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १८६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४), ३०५(अ), ३(५) प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि दिलीप द. धनवटे यांनी घटनास्थळी भेट दिली.

प्रेरणा अर्थ परिवाराची आर्थिक शिस्त व

विश्वासार्ह कारभाराचा नावलौकिक : आ. तांबे

चेअरमन सुरेश वाबळे यांच्याकडून आ. सत्यजीत तांबेंचा सन्मान

दिव्य सार्वमंथन रा. फॅक्टरी । प्रतिनिधी



गुहा येथील प्रेरणा ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या मुख्य शाखेस पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेचे चेअरमन सुरेश वाबळे यांच्या हस्ते आमदार सत्यजित तांबे यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या भेटीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रातील वाटचाल, ग्रामीण भागातील आर्थिकविकास, सामाजिक उपक्रम तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर मनमोकळी चर्चा झाली.

यावेळी आमदार सत्यजित तांबे यांनी प्रेरणा पतसंस्था व मल्टिस्टेटच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. सहकार क्षेत्रात काम करताना सभासदांचा विश्वास संपादन करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे आणि संस्थेच्या कामकाजात शिस्त राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. प्रेरणा पतसंस्था व मल्टिस्टेटने या बाबींना प्राधान्य देत आपली विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. संस्थेचा शिस्तबद्ध कारभार आणि विश्वासार्हतेमुळे जिल्ह्यात नावलौकिक निर्माण झाला असल्याचे गौरवोद्गार आमदार सत्यजित तांबे यांनी यावेळी व्यक्त केले. संस्थेचे संस्थापक चेअरमन सुरेश वाबळे यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीची, कार्यपद्धतीची तसेच सभासदांना दिल्या जाणाऱ्या विविध आर्थिक सुविधांची माहिती आमदार तांबे यांना दिली. संस्थेने जपलेली विश्वासार्हता, सभासदांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि सहकार क्षेत्रातील योगदान याबाबतही यावेळी चर्चा झाली.

मध्यरात्री १६ वर्षीय मुलगी घरातून बेपत्ता

दिव्य सार्वमंथन राहुरी । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, दरडगाव थडी परिसरात १६ वर्षे ९ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीचे मध्यरात्रीच्या सुमारास राहत्या घरातून अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संपूर्ण कुटुंब घरात झोपलेले असताना मुलगी अचानक गायब झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, मुलीला नेमके कोण आणि कोणत्या कारणासाठी घेऊन गेले, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्रित जेवण केले. त्यानंतर सर्वजण झोपी गेले. मात्र, ४ नोव्हेंबर रोजी पहाटे चार वाजता उठल्यानंतर मुलगी घरात दिसून आली नाही. अचानक मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांची एकच धावपळ उडाली.

पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ

संसारात विष कालवले; पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दिव्य सार्वमंथन रा. फॅक्टरी । प्रतिनिधी

लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यांतच विवाहितेच्या सुखी संसाराला छळाचे ग्रहण लागल्याचा धक्कादायक प्रकार राहुरी तालुक्यात उघडकीस आला आहे. पतीचा व्यवसाय उभा करण्यासाठी माहेरून तब्बल पाच लाख रुपये आणावेत, यासाठी विवाहितेचा सातत्याने शारीरिक व मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप आहे. पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर शिवीगाळ, दमदाटी, मारहाण आणि उपाशी ठेवण्यापर्यंत छळाची मजल गेली. अखेर विवाहितेला माहेरी पाठविताना लग्नातील सोन्याचे दागिनेही स्वत:कडे ठेवून घेतल्याची फिर्याद देण्यात आली आहे. या प्रकरणी पती, सासू, सासरे, दीर आणि दोन नणंद अशा सहा जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

श्रुती प्रकाश सांबारे (वय २१, रा. कानडगाव, ता. राहुरी) यांचा विवाह १८ मार्च २०२३ रोजी प्रकाश नानासाहेब सांबारे (रा. रामपूरवाडी, ता. राहाता) याच्यासोबत झाला होता. लग्नानंतर सुरुवातीचे दोन महिने व्यवस्थित गेल्यानंतर पतीकडून शिवीगाळ, दमदाटी आणि मारहाण सुरू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. लग्नात माहेरच्या मंडळींनी अपेक्षित मानपान केला नाही, तसेच गावात व्यवसाय सुरू करण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये, असा तगादा सासू–सासऱ्यांकडून लावण्यात आल्याचा आरोप आहे.

माहेरची परिस्थिती हलाखीची असून वडिलांचे छत्रही नसल्याने एवढी मोठी रक्कम देणे शक्य नसल्याचे श्रुती यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यानंतरही छळ थांबला नाही. विवाहितेला उपाशी ठेवून तिचा शारीरिक व मानसिक त्रास वाढविण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. नणंदांनीही पतीला फोन करून, 'श्रीमंत घरातील मुलगी पाहायला हवी होती, ती तुला व्यवसायासाठी आर्थिक मदत करू शकली असती,' असे सांगितल्याचा आरोप आहे. त्यानंतर पतीकडून पुन्हा मारहाण व त्रास दिला जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

डबल ट्रॉलीखाली दुचाकी चिरडली

वडिलांचा मृत्यू, मुलगा गंभीर

दिव्य सार्वमंथन नेवासा । प्रतिनिधी

डबल ट्रेलर ट्रॅक्टरला ओव्हरटेक करत असताना दुचाकीला स्विफ्ट कारचा डॅश बसला आणि दुचाकी थेट ऊस वाहतूक करणाऱ्या डबल ट्रॉलीखाली फरपटत घुसली. या भीषण अपघातात भाऊसाहेब कचरू चिंधे (वय ४५, रा. जळके बुद्रुक, देवगड फाटा) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा १८ वर्षीय मुलगा वैष्णव भाऊसाहेब शिंदे गंभीर जखमी झाला. नेवासा–नेवासा फाटा मार्गावरील ज्ञानेश्वर कॉलनीसमोर घडलेल्या या अपघाताने परिसर हादरला.

बांधकाम कामगार असलेले भाऊसाहेब आणि वैष्णव हे गज कटिंगचे मशीन घेण्यासाठी नेवासा येथे आले होते. युनिकॉर्न दुचाकीवरून (एमएच १७ डीएल ३३५८) ते नेवासा फाट्याकडे जात असताना ज्ञानेश्वर कॉलनीसमोर विना क्रमांकाच्या डबल ट्रॉली ट्रॅक्टरला ओव्हरटेक करत होते.

शेतकऱ्यांच्या मागण्यांवर संचालक मंडळांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे निर्देश

दिव्य सार्वमंथन अ.नगर । प्रतिनिधी



जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांबाबत बैठक घेऊन येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी तातडीने करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी अथवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित राहतील. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६–२७ च्या गळीत हंगामातील ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व मागण्या जाणून घेतल्या.

ऊस दर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कारखान्यांतील वजनकाट्यांच्या अचूकतेबाबत उपस्थित करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी यांच्या संयुक्त पथकामार्फत सर्व संबंधित कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींही पथकासोबत उपस्थित राहतील. त्यामुळे वजन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होणार आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगामादरम्यान येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राधान्याने हाताळून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यात समन्वय राखून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने मार्ग काढण्यात येईल, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

दैनिक दिव्य **सार्वमंथन** नवी दिशा, नवी आशा

दैनिक सार्वमंथन हे वृत्तपत्र मालक **प्रकाशक सौ. सपना अनिल कोळसे** यांनी मुद्रक **श्री अनिल गंगाधर कोळसे** यांच्या **स्वराज प्रेस आणि प्रिंटिंग, गट नं. ५९३, कोळसे निवास, कोळसे दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र** – ४१३७०५ येथे छापून सर्वे. नं ५९३, दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र ४१३७०५ येथे प्रकाशित केला. संपादक – **श्री अनिल गंगाधर कोळसे,** (सर्व न्यायालयीन वादविवाद राहुरी न्याय कक्षे अंतर्गत)

(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही) पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028

The Daily Divya Sarvmanthan Is Published By The Owner And Publisher, Sapna Anil Kolse, printed It At, printer Anil Gangadhar Kolses, Swaraj Press And Printing. S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705 And Published At S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705. editor-anil Gangadhar Kolse,

e-Mail-Sarvmanthan16@gmail.com, MHMAR/26/A3154. Postal Licence Number : SRP/146/2026-2028